“लातुर जिल्हयातील अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या आर्थीक विकासातील शेतीपुरक व्यवसायाचे योगदान”

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेअंतर्गत वाणिज्य विषयातील पी.एच.डी
(विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाचा शोध आराखडा

संशोधक

मलकापुरे सुदर्शन मधुकर

एम.कॉम, बी.एड, सेट, जि.डि.सी.ए.

मार्गदर्शक

डॉ. एस.के. खिल्लारे

एम.कॉम, पी एच. डी

प्राध्यापक आणि वाणिज्य विभागाचे प्रमुख

महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपुर जि. लातुर

संशोधन केंद्र

वाणिज्य व व्यवस्थापन शास्त्र विभाग

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापिठ नांदेड.

मार्च – २०२२

“लातुर जिल्हयातील अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासातील शेतीपुरक व्यवसायाचे योगदान”

♦ प्रस्तावनाः—

भारत हा कृषीप्रधान देश असला तरी सद्यस्थितीत भारतीय शेतकऱ्यांची आर्थीक स्थिती खुपच नाजूक असल्याचे जाणवते. याचे प्रमुख कारण म्हणजे शेतीचे झालेले असमान विभाजन होय. भारतातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे ७० टक्के लोकसंख्या खेडयांमध्ये राहते. या ७० टक्के लोकसंख्येचे उदरनिर्वाहाचे साधन शेती आहे. शेतकऱ्यांचे प्रमाण भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये जरी सर्वाधीक असले, तरी २० टक्के जमीनमालकांकडेच एकुण जमीनीच्या ७० टक्के जमीनीची मालकी आहे. आणि ५० टक्के जमीनीचे मालक हे सिमांत शेतकरी म्हणजेच अल्पभुधारक शेतकरी आहेत. ज्यांच्याकडे एक हेक्टरपेक्षासुद्धा कमी जमीन आहे.

भारतीय शेतकऱ्यांमध्ये झालेले जमीनीचे असमान वाटप, वेळोवेळी येणारे नैसर्गीक संकटे जसे, अनिश्चीत पाऊस, त्सुनामी, चक्रीवादळे, ओला व कोरडा दुष्काळ त्यामुळे निर्माण झालेले दुबार पेरणीचे संकट, त्याचबरोबर सुधारीत बि—बियाणांचा, किटकनाशके व खतांचा अभाव इत्यादीमुळे शेतकऱ्यांचे शेतीउत्पन्न मोठयाप्रमाणात घटल्याचे जाणवते. त्यामुळे बहुसंख्य भारतीय शेतकरी हे गरीब आहेत.

शेती व शेतकरी भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजले जातात. शेतकऱ्यांमुळे भारत अन्नधान्याच्या उत्पादनात जरी स्वावलंबी बनलेला असला तरीही गेल्या काही दशकात अनेक कारणांमुळे भारतीय शेतकऱ्यांचे शेती उत्पन्न घटल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीक्षेत्राचे योगदान कमी झालेले दिसत आहे. म्हणून भारतीय शेतकऱ्यांचा शेतीबरोबरच काही शेतीपुरक व्यवसाय करण्याकडे विशेष कल वाढलेला दिसून येत आहे. जसे की, यामध्ये दुग्ध व्यवसाय, शेळी व मेंढीपालन, कुक्कूटपालन, मत्सव्यवसाय, रेशीम उदयोग, मधुमक्षीका पालन इत्यादी, शेतीपुरक व्यवसायांचा भारतीय शेतकऱ्यांचे आर्थीक उत्पन्न वाढवण्यात मोलाचा वाटा आहे.

लातुर जिल्हयातील बहुसंख्य शेतकऱ्यांना अशाप्रकारच्या शेतीपुरक व्यवसायाचा खुप मोठा आधार मिळालेला दिसून येत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने अल्पभुधारक शेतकरी व त्यांचे काही शेतीपुरक व्यवसाय व त्याचा त्यांच्या आर्थीक विकासावर झालेला परिणाम याठिकाणी अभ्यासला जाणार आहे.

♦ संशोधनाची गरज :—

भारत हा जरी कृषीप्रधान देश असला तरी सद्यस्थितीत भारतीय शेतकऱ्यांकडे सरकारचे खुप दुर्लक्ष झालेले आहे. राज्य व केंद्र सरकार शेतकऱ्यांसाठी बऱ्याच योजनांची आखणी करत असतात. पण प्रत्यक्ष त्यांची अमलबजावणी काही अंशीच केली जाते. मोजक्याच शेतकऱ्यांना या शासकीय योजनांचा फायदा मिळत असलेला दिसून येत आहे. व त्याबरोबर शेतीपुरक व्यवसाय कसे करायचे याचे प्रशिक्षण प्रत्येक शेतकऱ्यांना मिळत नाही. आणि याच कारणामुळे भारतीय अल्पभुधारक शेतकरी होरपळला जातोय. सदरील विषय निवडण्याचे मुख्य कारण म्हणजेच अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासातील शेतीपुरक व्यवसायाच्या योगदानाचा अभ्यास करून योग्य शिफारशी करणे हे होय.

♦ संशोधनाची उद्दिष्टये :—

१ लातुर जिल्हयातील अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक—सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

२ लातुर जिल्हयातील अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नाचा आढावा घेणे.

३ लातुर जिल्हयातील अल्पभुधारक शेतकऱ्यांनी सुरू केलेल्या विविध शेतीपुरक व्यवसायाची माहिती मिळवीणे.

४ लातुर जिल्हयातील अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या शेती व शेतीपुरक व्यवसायांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.

५ लातुर जिल्हयातील अल्पभुधारक शेतकऱ्यांसाठी शासन राबवत असलेल्या विविध शासकीय योजनांचा अभ्यास करणे.

♦ संशोधनाची ग्रहिते :—

१ भारतीय शेतकरी हे गरीब आहेत.

२ शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा फायदा होतो.

३ शेतीबरोबरच शेतीपुरक व्यवसाय हे शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात भर टाकतात.

४ आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर अल्पभुधारक शेतकरी खुप कमी प्रमाणात करतात.

♦ **संशोधनाची व्याप्ती :—**

सदरील अध्यापनाचा विषय हा अल्पभुधारक शेतकरी आणि त्यांचे शेतीपुरक व्यवसाय यांच्याशी संबंधीत आहे. प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी महाराष्ट्रातील लातुर जिल्हयाची निवड केली आहे. लातुर जिल्हयातील सर्व तालुक्यांचा विशेष अभ्यास याठिकाणी करण्यात येणार आहे. त्यामध्ये अहमदपुर, चाकुर, लातूर, रेणापुर, जळकोट, उदगीर, देवणी, निलंगा, औसा, शिरूर अनंतपाळ या तालुक्यांमधील प्रत्येकी दहा—दहा गावांची व प्रत्येक गावामध्ये पाच—पाच शेतकऱ्यांची नमुना निवड पद्धतीच्या आधारे सहेतूक निवड करण्यात येणार आहे.

♦ **संशोधनाचा कालावधी :—**

प्रस्तुत विषय “लातुर जिल्हयातील अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासातील शेतीपुरक व्यवसायाचे योगदान” या विषयाचा अभ्यास करत असताना २०११ ते २०२१ या कालावधीची निवड करण्यात आली आहे.

♦ **संशोधनाची मर्यादा :—**

प्रस्तूत संशोधनाचे अध्ययन करत असताना माहिती संकलन करण्यासाठी फक्त लातुर जिल्हयाचाच विचार केला जाणार आहे. त्यामुळे क्षेत्रावर मर्यादा पडतात. व त्याबरोबरच २०११ ते २०२१ याच कालावधीची निवड माहिती संकलनासाठी केलेली आहे. त्यामुळे कालावधीवरही मर्यादा पडणार आहेत. त्याचबरोबर निष्कर्षावरही काही मर्यादा पडतात.

♦ **संशोधन साहित्याचा आढावा :—**

“लातुर जिल्हयातील अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासातील शेतीपुरक व्यवसायाचे योगदान” या विषयाचे संशोधन व अध्ययन करत असताना या विषयाला अनुषंगीक अनेक संशोधन साहित्याचा आढावा याठिकाणी घेण्यात आला आहे.

♦ **संशोधन पद्धती :—**

प्रस्तूत विषय संशोधनासाठी सामग्री संकलनाच्या खालील पद्धतींचा वापर करून सामग्री संकलन केले जाणार आहे.

- **प्राथमीक सामग्री**

  या पद्धतीच्या आधारे माहिती संकलन करत असताना संशोधकाने मुलाखत, प्रश्नावली व निरीक्षणाद्वारे लातुर जिल्हयातील अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या आर्थीक विकासात वाढ होण्याची व शेतीपुरक व्यवसायाचा जास्तीत जास्त फायदा या शेतकऱ्यांना कसा मिळेल याची कारणे शोधावयाची आहेत.

- **द्वितीय सामग्री**

  प्रस्तुत विषयाचे अध्ययन करत असताना संशोधक अल्पभुधारक शेतकऱ्यांची इंटरनेट, वर्तमान पत्रे व विविध शासकीय रेकॉर्ड, मासिके आणि अल्पभुधारक शेतकऱ्यांविषयीची विविध पुस्तके इत्यादी साहीत्यांच्या आधारे द्वितीय सामग्री प्राप्त करणार आहे.

- **नमुना निवड पद्धती**

- **विविध सांख्यिकीय साधने आणि तंत्र.**

♦ **प्रकरण विभागणी :—**

प्रकरण पहिले. प्रस्तावना

या प्रकरणामध्ये संशोधानाची गरज, संशोधनाची उद्दिष्टये, संशोधनाची ग्रहिते, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाची मर्यादा, संशोधन पद्धती इत्यादी बाबींचा विचार केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे. पुर्वाभ्यासाचे अवलोकन

संशोधन विषयाशी अनुषंगीक संशोधन साहित्याचा आढावा या प्रकरणात घेतला जाणार आहे.

प्रकरण तिसरे. लातुर जिल्हयातील अल्पभुधारक शेतकऱ्यांची माहिती

प्रकरण चौथे. लातुर जिल्हयातील अल्पभुधारक शेतकऱ्यांसाठीची शासकीय धोरणे व योजनांचा अभ्यास

प्रकरण पाचवे. शेतीपुरक व्यवसायाशी संबंधीत योजनांची माहिती

प्रकरण सहावे. सारांश, निष्कर्ष आणि उपाययोजना

♦ **संदर्भ सुची :—**

१ भारतीय अर्थव्यवस्था — दत्त आणि सुंदरम्

२ भारतीय अर्थव्यवस्था — मिश्रा पुरी

३ कृषी अर्थशास्त्र — डॉ. वसुधा पुरोहित. विद्या बुक्स पब्लीकेशर्स औरंगपुरा, औरंगाबाद.

४ शेतकऱ्यांचा आसुड — महात्मा ज्योतीबा फुले

५ भारतीय अर्थव्यवस्था — देसाई, भालेराव

६ महाराष्ट्राची आर्थीक पाहाणी अहवाल

मासिके :—

- बळीराजा
- ॲग्रोवन
- किसान योजना
- शेतकरी
- वसुंधरा

रेडिओ आणि दुरदर्शनवरील कार्यक्रम :—

- किसान वानी
- आमची माती आमची माणसं

संशोधक

मलकापुरे सुदर्शन मधुकर
(एम.कॉम,बी.एड,सेट,जि.डी.सी.ए.)

संशोधन मार्गदर्शक

डॉ. एस. के. खिल्लारे
(एम. कॉम, पी एच. डी)
प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख
महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपुर